2 8 SEP 2019
जनप्रवास
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात वैद्यकीय माहिती व्यवस्थापन शास्त्राचा नूतन अभ्यासक्रम

**कोल्हापूर • प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाने एम. एस्सी.साठी वैद्यकीय माहिती व्यवस्थापन शास्त्रामधील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करून विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत आणि कालसुसंगत शिक्षण व प्रशिक्षण उपलब्ध करण्याच्या दृष्टीने नवे दालन खुले केले आहे. महत्त्वाचे म्हणजे आंतरराष्ट्रीय सहकार्यातून चालविला जाणारा हा विद्यापीठातील पहिलाच अभ्यासक्रम आहे. येत्या ३० सप्टेंबरपर्यंत या अभ्यासक्रमासाठी अर्ज करण्याची मुदत आहे.

वैद्यकीय माहिती व्यवस्थापन शास्त्र (मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट) ही जागतिक स्तरावरील हेल्थकेअर उद्योगाच्या दृष्टीने उदयास आलेली एक अतिशय महत्त्वाची विज्ञानशाखा आहे. तिचे महत्त्व लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या जैव रसायनशास्त्र अधिविभागाने जर्मनीस्थित हॉश्चुल हॅनोव्हर युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायन्सेस अँड आर्टस् या विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने या विषयाचा एम.एस्सी.साठी दोन वर्षांचा अभ्यासक्रम या वर्षीपासून शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध केला आहे. या अभ्यासक्रमांतर्गत अखेरच्या चौथ्या सत्रामध्ये उपरोक्त दोन विद्यापीठांच्या दरम्यान स्टुडंट्स एक्स्चेंज उपक्रम राबविण्यात येणार असल्याने येथील विद्यार्थ्यांना जर्मनीतील विद्यापीठात जाऊन आंतरराष्ट्रीय स्तरावरील या क्षेत्रातील नवनवीन प्रवाहांचा वेध घेता येणे शक्य होणार आहे. या कालावधीतील सदर विद्यार्थ्यांची तेथील निवास व भोजन व्यवस्था संबंधित विद्यापीठ करणार आहे. त्यासाठी वेगळे शैक्षणिक शुल्क नसेल.

या अभ्यासक्रमाचे महत्त्व व वैशिष्ट्ये सांगताना जैवरसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. के. डी. सोनवणे म्हणाले, या अभ्यासक्रमामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय अध्यापन व संशोधन पद्धतींची थेट ओळख होणार आहे. त्याचप्रमाणे क्लिनिकल रिसर्चसाठी हा अभ्यासक्रम अतिशय उपयुक्त आहे. हेल्थकेअर क्षेत्रात ड्रग सिन्थेसिसपासून एनिमल अगर ह्युमन टेस्टिंगपर्यंत आणि तेथून अंतिम मान्यतेपर्यंतचा एक मोठा टप्पा असतो. त्यातल्या विविध टप्प्यांवर या विद्यार्थ्यांना काम करण्याची संधी असते. पोस्ट क्लिनिकल अभ्यास व संशोधन करण्यासाठीही मोठे अवकाश त्यांना उपलब्ध असते. अनेक राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय फार्मास्युटिकल्स उद्योगांसह क्लिनिकल रिसर्च करणाऱ्या संस्था, औषध कंपन्या, मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल्स, टेलिमेडिसीन आदि अनेकविध क्षेत्रांत संधी उपलब्ध आहेत. ड्रग रेग्युलेटरी अफेअर्स, क्लिनिकल को-ऑर्डिनेटर, क्लिनिकल डाटा असोसिएट्स, क्लिनिकल रिसर्चर, मेडिकल राईटिंग, कॅपिटल सीआरएफ डेव्हलपर तसेच संशोधक म्हणून या क्षेत्रात विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

झायडस, साव्हा, सिंजेन, एरिस लाइफ सायन्सेस, कॅक्टस, कॉग्निझंट, टाटा इएलएक्सआय, एस्ट्रा झेनिका, मर्क फार्मा, सिप्ला आदिंसारख्या प्रख्यात हेल्थकेअर कंपन्यांसह वैद्यकीय हॉस्पिटल्समध्येही अनेक नवनवीन रोजगार संधी निर्माण होत असल्याचेही डॉ. सोनवणे यांनी सांगितले.

हा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांच्यासह डॉ. ज्योती जाधव, डॉ. अतुल कापडी, जर्मनी येथील डॉ. ज्ञानेश लिमये आणि हॉश्चुल हॅनोव्हर विद्यापीठातील अधिविभाग प्रमुख तसेच युनेस्कोच्या बायोएथिक्स विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. गेरहार्ड फर्टविंगेल यांनी मोलाचे सहकार्य केल्याचे डॉ. सोनवणे यांनी सांगितले.

एम.एस्सी.- एम.एम.आय. अभ्यासक्रम असा आहे- या अभ्यासक्रमात पुढील अनेक आधुनिक विषयांचा समावेश करण्यात आला आहे.

इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी इन हेल्थ सायन्सेस, एपिडिमियॉलॉजी, मेडिकल इन्फॉर्मेटिक्स, जर्मन लँग्वेज ए-१, क्लिनिकल डेटा मॅनेजमेंट, क्लिनिकल क्वालिटी मॅनेजमेंट, क्लिनिकल रिसर्च, ड्रग डिस्कव्हरी, हॉस्पिटल मॅनेजमेंट, एथिक्स इन क्लिनिकल रिसर्च, क्लिनिकल ट्रायल प्रोटोकॉल, केस रिपोर्ट फॉर्मेट (सीआरएफ), ड्रग अप्रूव्हल प्रोसेस, नर्सिंग इन्फॉर्मेटिक्स, फार्मसी इन्फॉर्मेशन सिस्टीम, टोटल क्वालिटी मॅनेजमेंट (टीक्यूएम), क्वालिटी एश्योरन्स, फार्मेको व्हिजिलन्स (पीव्ही), फार्मेको व्हिजिलन्स ग्लोबल परस्पेक्टीव्ह, ग्लोबल ऑडिट, ड्रग रेग्युलेटरी ऑथोरिटी, गाइडलाइन्स फॉर फार्मास्युटिकल्स- न्युट्रास्युटिकल्स अँड कॉस्मेटिक्स, गाइडलाइन्स फॉर हर्बल अँड अल्टरनेटिव्ह मेडिसीन, प्रोसेस ऑफ नॅशनल ॲक्रिडिटेशन बोर्ड ऑफ हॉस्पिटल्स अॅन्ड हेल्थकेअर प्रोफेशनल्स (एन.ए.बी.एच.), डेटा ॲक्विझिशन, क्लिनिकल डेटा मॅनेजमेंट (सीडीएम), कलेक्शन इंटिग्रेशन अॅन्ड अव्हेलॅबिलिटी ऑफ डेटा, व्हेरिफिकेशन, व्हॅलिडेशन अँड क्वालिटी कंट्रोल, हॉस्पिटल इन्फॉर्मेशन सिस्टीम (एचआयएस), पेशंट रिपोर्टेड सिस्टीम्स (पीआरएस), पब्लिक हेल्थ अँड एचआयएस, प्रायव्हेट हॉस्पिटल्स अँड एचआयएस इत्यादी अत्याधुनिक हेल्थकेअर विषयांचा या अभ्यासक्रमात समावेश असल्याची माहिती डॉ. सोनवणे यांनी दिली.

2 8 SEP 2019

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ॲलिलोपॅथीविषयक जागृती आवश्यक : डॉ. होउयाला

## विद्यापीठात 'ग्यान' व्याख्यानमालेस प्रारंभ

**कोल्हापूर • प्रतिनिधी**

कृत्रिम रसायनांच्या अतिवापरामुळे होत असलेल्या वातावरणातील प्रदूषणास मानवच जबाबदार आहे. या परिस्थितीमध्ये विद्यार्थी, संशोधक आणि शिक्षकांमध्ये ॲलिलोपॅथीविषयक सार्वत्रिक जागृती करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ट्युनिशिया येथील सौजे विद्यापीठाच्या प्राध्यापक व ट्युनिशियन असोसिएशन फॉर सस्टेनेबल ॲग्रीकल्चर या संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती डॉ. राबिया होउयाला यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागात केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाच्या ग्लोबल इनिशिएटिव्ह फॉर ॲकॅडेमिक नेटवर्क (GI-N) या प्रकल्पांतर्गत डॉ. होउयाला यांच्या वनस्पतींच्या परस्परातील संबंधाचा शाश्वत शेतीमध्ये वापर या विषयावरील व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. ३ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या व्याख्यानमालेचे उद्घाटन शुक्रवारी नीलांबरी सभागृहात झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

भाषणाच्या सुरुवातीलाच डॉ. राबिया होउयाला यांनी हिंदीमधून उपस्थितांना अभिवादन केले. त्या म्हणाल्या, ॲलिलोपॅथीमध्ये पर्यावरणीय बदलांमुळे एका वनस्पतीकडून दुसऱ्या वनस्पतीवर किंवा एका सजीवाकडून दुसऱ्या सजीवावर होणाऱ्या जैवरासायनिक अभिक्रियांचा, परिणामांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे ॲलिलोपॅथी. आजच्या काळात सातत्याने असे बदल होत आहेत आणि मानवी हस्तक्षेपामुळे ते अधिक गतिमान पद्धतीने होत आहेत. यामध्ये सकारात्मक परिणामांपेक्षा दुष्परिणामांचे प्रमाण अधिक दिसते आहे. ते रोखण्यासाठी या शास्त्राच्या अभ्यासाची मोठी गरज आहे. त्या दृष्टीने अशा व्याख्यानमालांचे आयोजन खूप महत्त्वाचे आहे.



शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित ग्यान व्याख्यानमालेच्या उद्घाटन सत्रात बोलताना ट्युनिशियाच्या डॉ. राबिया होउयाला.

अध्यक्षीय भाषणात कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, 'ग्यान'सारखे उपक्रम हे आंतरराष्ट्रीय विद्यापीठीय समुदायांमध्ये विचारांची देवाणघेवाण करण्याच्या दृष्टीने अतिशय कळीची भूमिका बजावत आहेत. त्यातून ज्ञानवर्धनाबरोबरच अनेक नवनव्या गोष्टी स्थानिक विद्यार्थ्यांना, शिक्षकांना माहिती होतात. त्यांचे उपयोजन करण्यासाठी तज्ज्ञांसमवेत चर्चा करून त्यांचे मार्गदर्शन मिळविता येते. विद्यार्थी आणि संशोधक यांच्यात अशा संकल्पनांची देवाणघेवाण होणे अत्यंत आवश्यक आहे.

या अभ्यासक्रमासाठी ४५ जणांनी नोंदणी केलेली आहे. यावेळी वनस्पतीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. वर्षा जाधव, प्रा. एस. आर. यादव, प्रा. जी. बी. दीक्षित, प्रा. पी. डी. चव्हाण, प्रा. बी ए. कारदगे आदि उपस्थित होते. सुरुवातीला डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वागत केले. प्रा. एस. एस. कांबळे यांनी परिचय करून दिला. प्रा. एन. बी. गायकवाड यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 SEP 2019

जनप्रवास

# डॉ. शिवाजी जाधव यांची मीडिया कक्ष सदस्यपदी नियुक्ती

कोल्हापूर ● प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांची विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ साठी जिल्हास्तरीय मीडिया, संपर्क व्यवस्थापन आणि सोशल मीडिया कक्षाच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली. जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी दौलत देसाई यांनी ही नियुक्ती केली.

मुद्रित, इलेक्ट्रॉनिक तसेच सोशल मीडियावरील आक्षेपार्ह मजकूर, जाहिराती आदिंमध्ये निवडणूक कायद्याचे काटेकोर पालन होत असल्याची खात्री करण्याची जबाबदारी या समितीवर दिली आहे. राजकीय पक्ष व उमेदवारांकडून प्राप्त होणाऱ्या जाहिरातींचे प्रमाणिकरण करणाऱ्या समितीस सहाय्य करणे तसेच जाहिरातीचा मजकूर तपासण्याची जबाबदारी या समितीवर आहे. राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्याकडून सोशल मीडियावर केल्या जाणाऱ्या प्रचारात आचारसंहितेचा भंग होतो किंवा काय, यावर या समितीचे लक्ष राहिल. या समितीत सायबर तज्ज्ञ, संगणकतज्ज्ञ, राज्य कर



निरीक्षक, लेखापाल, माहिती सहायक आदिंसह विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश आहे. मुद्रीत, इलेक्ट्रॉनिक आणि वेब अशा सर्व प्रकारच्या माध्यमांतील पेड न्यूजच्या संशयित प्रकरणांची छाननी करून ही प्रकरणे माध्यम प्रमाणिकरण आणि सनियंत्रण समितीकडे पाठविण्याची जबाबदारीही या समितीवर सोपविण्यात आली आहे. जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते या समितीचे नोडल अधिकारी आहेत.

लोकमत


## टाळ्या, शिट्ट्यांनी दाद : अभिनयातून जनप्रबोधन; फलटण येथील मुधोजी महाविद्यालयात आयोजन

# कलाविष्कारातून तरुणाईचा जल्लोष

**आयुब मुल्ला ।**
लोकमत न्यूज नेटवर्क

**फलटण :** प्रभावी सादरीकरणातून वाहवा मिळवत कलागुणांना अप्रतिम उंचीवर नेऊन तरुणाईने मध्यवर्ती युवा महोत्सवात कलाविष्काच्या रंगांची उधळण केली. हातांनी देखणा आकार देऊन हस्तकलेतील किमया, तर पायांनी नृत्यातील चपलखता दाखविली. अभिनयातून समाजातील भीषण वास्तवाची मांडणी करीत व्यवस्थेवर प्रचंड प्रहार केला. लोकनृत्यांनी तर डोळ्यांचे पारणे फेडीत टाळ्या, शिट्ट्यांची दाद मिळविली. बहारदार सादरीकरणाने जल्लोषी वातावरणात धुमधडाक्यात महोत्सव रंगला.

फलटण (जि. सातारा) येथे शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व फलटण एज्युकेशन सोसायटी संचलित मुधोजी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ३९ वा मध्यवर्ती युवा महोत्सव सुरु आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील विविध महाविद्यालयांचे हजारो स्पर्धक या महोत्सवात सहभागी झाले होते.




वाद्यवृंद हा अनेक वाद्यांचा मेळ घालणारा लोकसंगीताचा प्रकार, तर तालासुरात डोलायला लावणारा ठरला. हस्तकलेतून मातीकाम, तर रांगोळी यातून रेखाटनातील सुबकता दाखविली. भारतीय संस्कृतीचे अनोखे दर्शन रांगोळीतून मांडले. स्थळचित्रण स्पर्धेत दिंडी व गणेशोत्सवाची सुरेख चित्रकला साकारली गेली.

फोटोग्राफीने तर डोळ्यांचे पारणेच फेडले. स्पॉट फोटोग्राफीसाठी कीटके व पक्षी असे विषय होते. कार्यक्रमाच्या परिसरातील कीटके, पक्षी यांना नजरेने शोधून कॅमेऱ्यात बंदिस्त करीत आपला कलेतील देखणेपणा स्पर्धकांनी दाखविला.



भारतीय संस्कृती या विषयावर रांगोळी रेखाटताना विद्यार्थिनी

फुलपाखरू, कबूतर, चिमण्यांचा थवा, घार तसेच मुंग्या, पावसाळी घोडे, असे फोटो वेगवेगळ्या अँगलने टिपले होते. नजरेने शोधणे अन् छायाचित्र घेण्याची दृष्टी दिपवणारी अशीच होती.

सांघिक रचनेतून टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनविण्याचा अनोखा प्रयोग सिद्ध केला गेला. प्रबोधन केले. आयत्या वेळी देण्यात आलेल्या 'स्त्रीशक्ती व ग्रोथ' या विषयावरती भूतकाळ, वर्तमान काळातील परिस्थिती मांडून भविष्यकाळ कसा असेल, हे अगदी सहज, साध्या पद्धतीने सांगताना केलेली रचनाकृती उत्तमच होती. शास्त्रीय सुरवाद्य स्पर्धेत ताल-सुरांची जुगलबंदीच सुरु होती. तबला आणि हार्मोनियमच्या सुरमय मैफलीचा अनुभव आला.

एकांकिकेतील अभिनय कौतुकास पात्र ठरला. नेपथ्याची सजावट अभ्यासाची, ज्ञानाची, कल्पकतेची जाणीव करुन देणारी अशीच ठरली. जीवन खूप सुंदर आहे. क्षुल्लक कारणासाठी आत्महत्या करुन जीवन संपवू नका. 'हरला तरी नव्या उमेदीने उभे राहा अन् जगा', या एकांकिकेने प्रेमभंगचा आशय मांडला. 'मोठा पाऊस आला आणि...' या एकांकिकेने महापुरातील ऋणानुबंध याची मांडणी केली. 'बेबी बर्थ' एकांकिकेने आई व वडील यांची बाळ जन्माला येण्यापूर्वीची अवस्था व त्यांची घालमेल यांची केलेल्या मांडणीला उत्स्फूर्त टाळ्यांचा प्रतिसाद मिळाला.

बाप आणि मुलगी यांचा जिव्हाळा 'सायकल' या एकांकिने अप्रतिम सादर केला. काश्मीर प्रश्न, मर्शिया अशा विविध विषयांवरील एकांकिका सरस अशाच होत्या.

“



संयोजक म्हणून आणि स्पर्धक म्हणून मोठा आनंद झाला. चांगला अनुभव आला. आदरातिथ्य करण्याची संधी मिळाली. संस्कृतीचा वारसा पुढे नेण्यासाठी युवा महोत्सव अत्यंत गरजेचा आहे.

**- प्रज्ज्वल नाळे,**
मुधोजी महाविद्यालय, फलटण.



यामध्ये तरुणाईचा सहभाग अजून वाढला पाहिजे. ग्रामीण भागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी उत्स्फूर्तपणे सहभागी होतील, असे प्रयत्न झाले पाहिजेत. अनेक नवीन मैत्रिणी झाल्या. वेगळाच आनंद मिळाला.

**- सुमेधा पवार,** दहिवडी कॉलेज.



महोत्सवातून खूप शिकायला मिळाले. नवीन कला प्रकारात सहभाग घेण्याचा निर्धार केला. यातून युवा पिढीची ताकद समजून येते. 'हम भी कुछ कमी नहीं' हे कॉलेजच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी दाखवून दिले.

- धनश्री माने, डी.के.ए.एस.सी. कॉलेज, इचलकरंजी

लोकमत



फलटण येथे मुधोजी महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ३९ वा मध्यवर्ती युवा महोत्सवात करकट्टम लोकनृत्य सादर करून विद्यार्थिनींनी उपस्थितांना डोलायला लावले.

लोकमत

# शिवाजी जाधव यांची नियुक्ती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या 'पत्रकारिता व जनसंवाद' विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांची विधानसभा निवडणूक २०१९ साठी जिल्हास्तरीय मीडिया, संपर्क व्यवस्थापन आणि सोशल मीडिया कक्षाच्या सदस्यपदी नियुक्ती केली. जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी दौलत देसाई यांनी ही नियुक्ती केली. मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, सोशल मीडियावरील आक्षेपार्ह मजकूर, जाहिराती, आदींमध्ये निवडणूक कायद्याचे काटेकोर पालन होत असल्याची खात्री करण्याची जबाबदारी या समितीवर दिली आहे.

लोकमत

# समस्या समजण्यास संशोधन प्रकल्पाची गरज

## डी. टी. शिर्के : तृतीयपंथीयांसाठी शिवाजी विद्यापीठामध्ये कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** तृतीयपंथीय लोकांच्या समस्यांचे स्वरुप लक्षात येण्यासाठी विविध संशोधन प्रकल्प हाती घेण्याची गरज आहे. शिवाजी विद्यापीठाच्या बृहत-आराखड्यामध्ये या व्यक्तींसाठी विविध उपक्रम राबविण्याची तरतूद करण्यात आली आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी शुक्रवारी येथे केले.

विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे तृतीयपंथीयांसाठी आयोजित केलेल्या कौशल्य विकास कार्यशाळेमध्ये ते बोलत होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण, मैत्री फौंडेशनच्या अध्यक्ष मयुरी आळवेकर, विशाल पिंजानी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातर्फे शुक्रवारी तृतीयपंथीयांसाठी आयोजित कौशल्य विकास कार्यशाळेत प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून विशाल पिंजानी, मयूरी आळ्वेकर, भारती पाटील, ए. एम. गुरव उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, अशी कार्यशाळा विद्यापीठात प्रथमच होत असून, तृतीयपंथी व्यक्तींमधील कौशल्य विकासासाठी सुरु झालेला हा उपक्रम यापुढील काळातही निरंतर आणि व्यापक स्वरूपात विद्यापीठ राबवील. या लोकांना सर्वांनी समतेची आणि समानतेची वागणूक दिली पाहिजे. ही आपली सार्वजनिक जबाबदारी आहे. यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक घटकाला शैक्षणिक सेवा पुरविणे ही विद्यापीठाची जबाबदारी आहे. शिक्षणासह सामाजिक हक्कांपासून तृतीयपंथीय नागरिक वंचित राहणार नाहीत, यासाठी प्रयत्न करण्यास विद्यापीठ कटिबद्ध आहे.

या कार्यशाळेत कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आंतरराष्ट्रीय व्याख्याते कौस्तुभ बंकापुरे, डॉ. विद्यानंद खंडागळे, कृष्णा पाटील, पद्मश्री मादनाईक, ए. एम. गुरव यांनी विविध विषयांवर कौशल्य प्रशिक्षण दिले. कार्यशाळेसाठी कोल्हापूर परिसरातील तृतीयपंथी नागरिक उपस्थित होते.

### माणूस म्हणून जगण्याचा हक्क मिळेल

या कार्यक्रमात मयूरी आळवेकर म्हणाल्या, तृतीयपंथीयांचे प्रश्न विद्यापीठ प्रशासन समजावून घेत आहे आणि त्यावर उपाययोजना करण्यासाठी, दिलासा देण्यासाठी विद्यापीठ पुढे आले आहे, ही अत्यंत स्तुत्य बाब आहे. एक माणूस म्हणून जगण्याचा हक्क विद्यापीठाच्या माध्यमातून तृतीयपंथीयांना मिळेल.

पुढारी

# ॲलिलोपॅथीविषयक सार्वत्रिक जागृती आवश्यक : डॉ. राबिया होउयाला

## शिवाजी विद्यापीठात 'ग्यान' व्याख्यानमालेस प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कृत्रिम रसायनांच्या अतिवापरामुळे होत असलेल्या वातावरणातील प्रदूषणास मानव जबाबदार आहे. या परिस्थितीमध्ये विद्यार्थी, संशोधक व शिक्षकांमध्ये ॲलिलोपॅथीविषयक सार्वत्रिक जागृती करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन ट्युनिशिया येथील सौजे विद्यापीठाच्या प्राध्यापक व ट्युनिशियन असोसिएशन फॉर सस्टेनेबल ॲग्रीकल्चर संस्थेच्या अध्यक्षा डॉ. राबिया होउयाला यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अधिविभागात केंद्रीय मनुष्यबळ मंत्रालयाच्या ग्लोबल इनिशिएटिव्ह फॉर ॲकॅडमिक नेटवर्क (ग्यान) प्रकल्पांतर्गत डॉ. होउयाला यांच्या 'वनस्पतींच्या परस्परातील संबंधाचा शाश्वत शेतीमध्ये वापर'



**कोल्हापूर : ग्यान व्याख्यानमाला उद्घाटन सत्रात बोलताना डॉ. राबिया होउयाला. (छाया : पप्पू आत्तार)**

या विषयावरील व्याख्यानमालेप्रसंगी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते. त्या म्हणाल्या, ॲलिलोपॅथीमध्ये पर्यावरणीय बदलांमुळे एका वनस्पतीकडून दुसऱ्या वनस्पतीवर किंवा एका सजीवाकडून दुसऱ्या सजीवावर होणाऱ्या जैवरासायनिक अभिक्रियांचा, परिणामांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे ॲलिलोपॅथी. आजच्या काळात सातत्याने असे बदल होत आहेत आणि मानवी हस्तक्षेपामुळे ते अधिक गतिमान पद्धतीने होत आहेत. यामध्ये सकारात्मक परिणामांपेक्षा दुष्परिणामांचे प्रमाण अधिक दिसते आहे. ते रोखण्यासाठी या शास्त्राच्या अभ्यासाची मोठी गरज आहे. यावेळी वनस्पतीशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. वर्षा जाधव, प्रा. एस. आर. यादव, प्रा. जी. बी. दीक्षित, प्रा. पी. डी. चव्हाण, प्रा. बी. ए. कारदगे आदी उपस्थित होते. डॉ. डी. के. गायकवाड यांनी स्वागत केले. प्रा. एस. एस. कांबळे यांनी परिचय करून दिला. प्रा. एन. बी. गायकवाड यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठात वैद्यकीय माहिती व्यवस्थापन शास्त्र अभ्यासक्रम

## जर्मन विद्यापीठाचे सहकार्य; पहिलाच आंतरराष्ट्रीय प्रयोग

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाने एम.एस्सी. साठी वैद्यकीय माहिती व्यवस्थापन शास्त्रामधील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करून विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत व कालसुसंगत शिक्षण व प्रशिक्षण उपलब्ध करण्याच्या दृष्टीने नवे दालन खुले केले आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्यातून चालविला जाणारा विद्यापीठातील पहिलाच अभ्यासक्रम आहे.

वैद्यकीय माहिती व्यवस्थापन शास्त्र (मेडिकलइन्फॉर्मेशनमॅनेजमेंट) ही जागतिक स्तरावरील हेल्थकेअर उद्योगाच्या दृष्टीने उदयास आलेली महत्त्वाची विज्ञान शाखा आहे. याचे महत्त्व लक्षात घेऊन जैव रसायनशास्त्र अधिविभागाने जर्मनीस्थित हॉश्चुल हॅनोव्हर युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायन्सेस अँड आर्टस् विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने या विषयाचा एम.एस्सी.साठी दोन वर्षांचा अभ्यासक्रम यावर्षीपासून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध केला आहे.

### अभ्यासक्रमात आधुनिक विषयांचा समावेश

या अभ्यासक्रमात अनेक आधुनिक विषयांचा समावेश करण्यात आला आहे. यात इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी इन हेल्थ सायन्सेस, एपिडिमियॉलॉजी, मेडिकल इन्फॉर्मेटिक्स, क्लिनिकल डेटा मॅनेजमेंट, क्लिनिकल क्वालिटी मॅनेजमेंट, क्लिनिकल रिसर्च, ड्रग डिस्कव्हरी, हॉस्पिटल मॅनेजमेंट, केस रिपोर्ट फॉर्मेट (सीआरएफ), ड्रग अपूव्हल प्रोसेस, नर्सिंग इन्फॉर्मेटिक्स, फार्मसी इन्फॉर्मेशन सिस्टीम, ग्लोबल ऑडिट, ड्रग रेग्युलेटरी ऑथोरिटी, गाईडलाईन्स फॉर फार्मास्युटिकल्स-न्यूट्रास्युटिकल्स अँड कॉस्मेटिक्स आदींचा समावेश आहे.




३० सप्टेंबरपर्यंत अभ्यासक्रमासाठी अर्ज करण्याची मुदत आहे.

अभ्यासक्रमांतर्गत अखेरच्या सत्रामध्ये दोन विद्यापीठांच्या दरम्यान स्टुडंटस् एक्स्चेंज उपक्रम राबविण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना जर्मनीतील विद्यापीठात जाऊन आंतरराष्ट्रीय स्तरावरील या क्षेत्रातील नवनवीन प्रवाहांचा वेध घेता येणे शक्य होणार आहे. या अभ्यासक्रमामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय अध्यापन व संशोधन पद्धतींची थेट ओळख होणार आहे. त्याचप्रमाणे क्लिनिकल रिसर्चसाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त असल्याचे जैवरसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. के. डी. सोनवणे यांनी सांगितले.

विद्यापीठाने जर्मनीच्या विद्यापीठाच्या सहकार्याने सुरू केलेला वैद्यकीय माहिती व्यवस्थापन हा एम.एस्सी. अभ्यासक्रम हेल्थकेअर उद्योगाला अद्ययावत शिक्षण व प्रशिक्षण घेतलेले मनुष्यबळ उपलब्ध करून देणारा अभ्यासक्रम आहे, असे विद्यापीठाच्या एम.एम.आय. अभ्यासक्रमासाठी नियुक्त अभ्यास मंडळ उपसमितीचे सदस्य डॉ. अतुल कापडी यांनी सांगितले.

> “ हेल्थकेअर उद्योगाशी निगडित असणारा मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट महत्त्वाचा अभ्यासक्रम आहे. त्याचा लाभ विद्यार्थ्यांना व्हावा या दृष्टीने जर्मनीतील हॉश्चुल हॅनोव्हर विद्यापीठाशी शिवाजी विद्यापीठाने सहकार्य करार करून स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्राम राबविण्याचे ठरविले. विद्यार्थ्यांना भावी करिअरच्या दृष्टीने फायदा होणार आहे.
>
> - **डॉ. देवानंद शिंदे,** कुलगुरू

पुढारी

# पुरुषोत्तम करंडक कुरूंदवाड महाविद्यालयाकडे

**कोल्हापूर :** राष्ट्रीय कलोपासक पुणे व संगीत नाट्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ व गायन समाज देवल क्लब यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पुरुषोत्तम करंडक अंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत कोल्हापूर केंद्रातून दत्त कनिष्ठ महाविद्यालय कुरुंदवाडने सांघिक विभागात प्रथम क्रमांक पटकवला.

दुसरा क्रमांक राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी इस्लामपूर, तृतीय क्रमांक दत्ताजीराव कदम आर्टस् ॲण्ड सायन्स इचलकरंजी यांनी पटकवला. उत्कृष्ट स्त्री अभिनेत्री प्रणाली पाटील (राजारामबापू इन्स्टिट्यूट इस्लामपूर), सर्वोत्कृष्ट विद्यार्थी लेखक सुदर्शन खोत(विवेकानंद महाविद्यालय), सर्वोत्कृष्ट विद्यार्थी दिग्दर्शक, सर्वोत्कृष्ट वाचक अभिनय प्रथम क्रमांक कादंबरी माळी, (दत्त महाविद्यालय, कुरुंदवाड), उत्कृष्ट अभिनय श्वेता संजय गिरी (भारती विद्यापीठ कोल्हापूर). विजेत्यांना अभिनेता आनंद काळे, राजेंद्र चित्रे, सुबोध गद्रे आदींच्या हस्ते बक्षीस देण्यात आले.



कोल्हापूर : विद्यापीठात तृतीय पंथीयांसाठी आयोजित कौशल्य विकास कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. विशाल पिंजानी, मयुरी आळवेकर, डॉ. भारती पाटील, डॉ. ए. एम. गुरव.

# तृतीय पंथीयांच्या सामाजिक हक्कांसाठी विद्यापीठ कटिबद्ध

## प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

समाजातील प्रत्येक घटकाला शैक्षणिक सेवा पुरवणे ही विद्यापीठाची जबाबदारी आहे. शिक्षणासह सामाजिक हक्कांपासून तृतीय पंथीय नागरिक वंचित राहणार नाहीत, यासाठी प्रयत्न करण्यास शिवाजी विद्यापीठ कटिबद्ध आहे, अशी ग्वाही प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे तृतीय पंथी व्यक्तींसाठी आयोजित कौशल्य विकास कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, कौशल्य विकास अधिकारी महेश चव्हाण, मैत्री फाऊंडेशनच्या अध्यक्ष मयुरी आळवेकर व विशाल पिंजानी उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, तृतीयपंथी व्यक्तींना समता व समानतेची वागणूक देणे ही सार्वजनिक जबाबदारी आहे. तृतीय पंथीय लोकांच्या समस्यांचे स्वरुप लक्षात येण्यासाठी विविध संशोधन प्रकल्पही हाती घेण्याची गरज आहे. विद्यापीठाच्या बृहत-आराखड्यामध्ये तृतीय पंथी व्यक्तींसाठी विविध उपक्रम राबविण्यासाठी तरतूद केली आहे.

मयुरी आळवेकर म्हणाल्या, तृतीय पंथीयांचे प्रश्न विद्यापीठ प्रशासन समजावून घेत आहे. त्यावर उपाययोजना करण्यासाठी, दिलासा देण्यासाठी विद्यापीठ पुढे आले आहे, ही स्तुत्य बाब आहे. एक माणूस म्हणून जगण्याचा हक्क विद्यापीठाच्या माध्यमातून तृतीय पंथीयांना मिळेल. कार्यशाळेत दिवसभरात कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह आंतरराष्ट्रीय व्याख्याते कौस्तुभ बंकापुरे, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. कृष्णा पाटील, पद्मश्री मादनाईक, डॉ. ए. एम. गुरव यांनी विविध विषयांवर कौशल्य प्रशिक्षण दिले. कार्यशाळेसाठी कोल्हापूर परिसरातील बहुसंख्य तृतीय पंथी नागरिक उपस्थित होते.

# विद्यापीठात वैद्यकीय माहिती व्यवस्थापन शास्त्र अभ्यासक्रम

## जर्मन विद्यापीठाच्या मदतीने राबवला जाणारा पहिलाच उपक्रम

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाने एम. एस्सी. साठी वैद्यकीय माहिती व्यवस्थापन शास्त्रामधील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करून विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत आणि काल सुसंगत शिक्षण व प्रशिक्षण उपलब्ध करण्याच्या दृष्टीने नवे दालन खुले केले आहे. महत्त्वाचे म्हणजे आंतरराष्ट्रीय सहकार्यातून चालवला जाणारा हा विद्यापीठातील पहिलाच अभ्यासक्रम आहे. येत्या ३० सप्टेंबरपर्यंत या अभ्यासक्रमासाठी अर्ज करण्याची मुदत आहे.

वैद्यकीय माहिती व्यवस्थापन शास्त्र (मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट) ही जागतिक स्तरावरील हेल्थकेअर उद्योगाच्या दृष्टीने उदयास आलेली एक अतिशय महत्त्वाची विज्ञानशाखा आहे. तिचे महत्त्व लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या जैव रसायनशास्त्र अधिविभागाने जर्मनीस्थित हॉश्चूल हॅनोव्हर युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायन्सेस अँड आर्टस् या विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने या विषयाचा एम. एस्सी.साठी दोन वर्षांचा अभ्यासक्रम या वर्षीपासून शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध केला आहे.

### हेल्थकेअर उद्योगाला अद्ययावत मनुष्यबळासाठी उपयुक्त

विद्यापीठाच्या एम.एम.आय. अभ्यासक्रमासाठी नियुक्त अभ्यास मंडळ उपसमितीचे सदस्य डॉ. अतुल कापडी म्हणाले, वैद्यकीय माहिती व्यवस्थापन हा अभ्यासक्रम हेल्थकेअर उद्योगाला अद्ययावत शिक्षण व प्रशिक्षण घेतलेले मनुष्यबळ उपलब्ध करून देणारा अत्यावश्यक अभ्यासक्रम आहे.



या अभ्यासक्रमांतर्गत अखेरच्या चौथ्या सत्रामध्ये उपरोक्त दोन विद्यापीठांच्या दरम्यान स्टुडंटस् एक्स्चेंज उपक्रम राबवण्यात येणार असल्याने येथील विद्यार्थ्यांना जर्मनीतील विद्यापीठात जाऊन आंतरराष्ट्रीय स्तरावरील या क्षेत्रातील नवनवीन प्रवाहांचा वेध घेता येणे शक्य होणार आहे.

या अभ्यासक्रमाचे महत्त्व व वैशिष्ट्ये सांगताना जैव रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. के. डी. सोनवणे म्हणाले, या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय अध्यापन व संशोधन पद्धतींची ओळख होणार आहे. त्याचप्रमाणे क्लिनिकल रिसर्चसाठी हा अभ्यासक्रम अतिशय उपयुक्त आहे. हेल्थकेअर क्षेत्रात ड्रग सिन्थेसिसपासून एनिमल अगर ह्युमन टेस्टिंगपर्यंत आणि तेथून अंतिम मान्यतेपर्यंतचा एक मोठा टप्पा असतो. त्यातल्या विविध टप्प्यांवर या विद्यार्थ्यांना काम करण्याची संधी असते. पोस्ट क्लिनिकल अभ्यास व संशोधन करण्यासाठीही मोठे अवकाश त्यांना उपलब्ध असते. अनेक राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय फार्मास्युटिकल्स उद्योगांसह क्लिनिकल रिसर्च करणाऱ्या संस्था, औषध कंपन्या, मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल्स, टेलिमेडिसीन आदी अनेकविध क्षेत्रांत संधी उपलब्ध आहेत.

हा अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील यांच्यासह डॉ. ज्योती जाधव, डॉ. अतुल कापडी, जर्मनी येथील डॉ. ज्ञानेश लिमये आणि हॉश्चूल हॅनोव्हर विद्यापीठातील अधिविभागप्रमुख तसेच युनेस्कोच्या बायोएथिक्स विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. गेरहार्ड फर्टविंगेल यांनी मोलाचे सहकार्य केल्याचे डॉ. सोनवणे यांनी सांगितले.

### आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमाचा विद्यार्थ्यांना लाभ



हेल्थकेअर उद्योगाशी निगडित असणारा मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट हा आजघडीचा एक महत्त्वाचा अभ्यासक्रम आहे. त्याचा लाभ विद्यार्थ्यांना व्हावा, या दृष्टीने जर्मनीतील हॉश्चूल हॅनोव्हर विद्यापीठाशी शिवाजी विद्यापीठाने सहकार्य करार करून स्टुडंट एक्स्चेंज प्रोग्राम राबवण्याचे ठरवले आहे.

**-डॉ. देवानंद शिंदे,**
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

# डॉ. शिवाजी जाधव यांची नियुक्ती

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**



शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांची विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९ साठी जिल्हास्तरीय मीडिया, संपर्क व्यवस्थापन आणि सोशल मीडिया कक्षाच्या सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली. जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी दौलत देसाई यांनी ही नियुक्ती केली.

मुद्रित, इलेक्ट्रॉनिक तसेच सोशल मीडियावरील आक्षेपार्ह मजकूर, जाहिराती आदींमध्ये निवडणूक कायद्याचे काटेकोर पालन होत असल्याची खात्री करण्याची जबाबदारी या समितीवर देण्यात आली आहे. जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते या समितीचे नोडल अधिकारी आहेत.

# ...दिसेल त्याला कौशल्य प्रशिक्षण

## शिवाजी विद्यापीठाचा अभिनव उपक्रम; तीन हजारांवर विद्यार्थी, पालकांना प्रशिक्षण

सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाच्या आवारात आज 'असेल तिथे, दिसेल त्याला कौशल्य प्रशिक्षण' देण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांना संभाषण कौशल्यासारखे सॉफ्ट स्किल शिकवण्यात आले. विविध कौशल्यांच्या प्राथमिक बाबी यावेळी विद्यार्थ्यांना सांगण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी या अभियानात उत्स्फूर्त सहभाग घेतला. सुमारे ३४५० विद्यार्थ्यांना आणि ६७ पालकांना प्रशिक्षण देण्यात आले.**



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर गुरुवारी विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले.**

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे आज हा उपक्रम झाला. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोर झालेल्या या उपक्रमाचे औपचारिक उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते झाले.

डॉ. शिर्के म्हणाल,''विद्यापीठाच्या कौशल्य विकास केंद्रातर्फे या उपक्रमामध्ये सातत्य राहण्याच्या दृष्टीने आठवड्यातून एकदा विद्यापीठातील सर्व वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांसाठी तसेच केंद्रामध्येसुद्धा इच्छुक विद्यार्थ्यांसाठी आठवड्याला एक या प्रमाणे कौशल्य प्रदान उपक्रम राबविण्यात यावा. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमांचा फायदा करून घ्यावा.''

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर म्हणाले,''विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणाच्या बरोबरीने विविध कौशल्ये ज्ञात असावीत, यादृष्टीने विद्यापीठाने गेल्या काही वर्षांत सातत्याने कौशल्यविषयक उपक्रम राबविले आहेत. त्याचे अत्यंत सकारात्मक परिणामही दिसून येत आहेत. केंद्राकडून भावी काळातही विद्यार्थ्यांसाठी असे नवनवीन उपक्रम राबविण्याचा मानस आहे.''

केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव म्हणाले,''विद्यापीठाच्या या परिसरात विद्यार्थी, पालक, कर्मचारी, शिक्षक अगर नागरिक असा चार किंवा अधिक जणांचा समूह असेल, त्याला जागेवर प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यासाठी इन्फोसिसच्या माध्यमातून ट्रेन दि ट्रेनर्स कार्यशाळेतून प्रशिक्षण घेतलेले प्रशिक्षक ही कौशल्ये प्रदान करणार आहेत. प्राथमिक स्तरावर सॉफ्ट स्किल प्रदान करण्यात येणार आहेत. अशा प्रकारचा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणारे हे देशातील पहिले विद्यापीठ आहे.''

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रशिक्षकांना पुस्तक भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी अधिसभा सदस्य पंकज मेहता, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. के.व्ही. मारुलकर, डॉ. केबी. पाटील, डॉ. गजानन राशिनकर, एम. व्ही. चव्हाण, शिवप्रसाद शेटे, विजयकुमार मुत्नाळे, विजय तिवारी, शिवप्रसाद बेकनाळकर, लिटॉन आर्दीसह प्रशिक्षक उपस्थित होते. प्रशिक्षणानंतर लगेचच मुख्य प्रशासकीय इमारतीपासूनच प्रशिक्षण उपक्रमास सुरवात झाली. प्रशिक्षकांनी विद्यार्थी-विद्यार्थिनींना सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट संदर्भात मार्गदर्शन दिले.

# न्यू कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन

फुलेवाडी, ता. २७ : न्यू कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्घाटन झाले. शिवाजी विद्यापीठाचे उपकुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पांडव म्हणाले, ''राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास घडून येतो. समाजातील बांधिलकी जोपासण्याचे काम विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेमुळे होते.''

प्राचार्य डॉ. व्ही. एन. पाटील अध्यक्षस्थानी होते. कनिष्ठ विभागातील उपप्राचार्य प्रा. टी. के. सरगर, वरिष्ठ प्रकल्प अधिकारी सौ. चैत्रा राजाज्ञा, डॉ. एम. बी. वाघमारे उपस्थित होते. ज्युनिअर विभागीय प्रकल्प अधिकारी प्रा. आर. एस. किरुळकर यांनी आभार मानले.

# ‘वैद्यकीय माहिती व्यवस्थापन’ची सुविधा

## आंतरराष्ट्रीय सहकार्यातून एम.एस्सी.साठी पहिलाच पदव्युत्तर अभ्यासक्रम : दोन वर्षे कालावधी

**उजळाईवाडी, ता. २७ : शिवाजी विद्यापीठाने एम.एस्सी.साठी वैद्यकीय माहिती व्यवस्थापन शास्त्रामधील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केला असून, ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याची मुदत आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्यातून चालविला जाणारा हा विद्यापीठातील पहिलाच अभ्यासक्रम आहे. विद्यापीठाच्या जैवरसायनशास्त्र अधिविभागाने जर्मनीस्थित हॉश्चुल हॅनोव्हर युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायन्सेस अँड आर्टस या विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने या विषयाचा एम.एस्सी.साठी दोन वर्षांचा अभ्यासक्रम या वर्षीपासून येथील विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध केला आहे.**



> **शिवाजी विद्यापीठाने जर्मनीच्या विद्यापीठाच्या सहकार्याने सुरू केलेला वैद्यकीय माहिती व्यवस्थापन हा एम.एस्सी. अभ्यासक्रम हेल्थकेअर उद्योगाला अद्ययावत शिक्षण आणि प्रशिक्षण घेतलेले मनुष्यबळ उपलब्ध करून देणारा अत्यावश्यक अभ्यासक्रम आहे.**
>
> – **डॉ. अतुल कापडी,** सदस्य, अभ्यास मंडळ उपसमिती

वैद्यकीय माहिती व्यवस्थापन शास्त्र (मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट) ही जागतिक स्तरावरील हेल्थकेअर उद्योगाच्या दृष्टीने उदयास आलेली एक अतिशय महत्त्वाची विज्ञान शाखा आहे.

अभ्यासक्रमांतर्गत अखेरच्या चौथ्या सत्रात विद्यापीठांच्या दरम्यान स्टुडंट्स एक्स्चेंज उपक्रम राबविण्यात येणार असल्याने येथील विद्यार्थ्यांना जर्मनीतील विद्यापीठात जाऊन आंतरराष्ट्रीय स्तरावरील या क्षेत्रातील नवनवीन प्रवाहांचा वेध घेता येणे शक्य होणार आहे. या कालावधीतील सदर विद्यार्थ्यांची तेथील निवास व भोजन व्यवस्था संबंधित विद्यापीठ करणार आहे. त्यासाठी वेगळे शैक्षणिक शुल्क नसेल.

अभ्यासक्रमात इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी इन हेल्थ सायन्सेस, एपिडिमियॉलॉजी, मेडिकल इन्फॉर्मेटिक्स, जर्मन लँग्वेज ए-१, क्लिनिकल डेटा मॅनेजमेंट, क्लिनिकल क्वालिटी मॅनेजमेंट, क्लिनिकल रिसर्च, ड्रग डिस्कव्हरी, हॉस्पिटल मॅनेजमेंट, एथिक्स इन क्लिनिकल रिसर्च, क्लिनिकल ट्रायल प्रोटोकॉल, केस रिपोर्ट फॉर्मेट (सीआरएफ), ड्रग अप्रूव्हल प्रोसेस, नर्सिंग इन्फॉर्मेटिक्स, फार्मसी इन्फॉर्मेशन सिस्टीम, टोटल क्वालिटी मॅनेजमेंट (टीक्यूएम), क्वालिटी एश्योरन्स, फार्मेको व्हिजिलन्स (पीव्ही), फार्मेको व्हिजिलन्स ग्लोबल परस्पेक्टीव्ह, ग्लोबल ऑडिट, ड्रग रेग्युलेटरी ऑथोरिटी, गाइडलाइन्स फॉर फार्मास्युटिकल्स- न्युट्रास्युटिकल्स अँड कॉस्मेटिक्स, गाइडलाइन्स फॉर हर्बल अँड अल्टरनेटिव्ह मेडिसीन, प्रोसेस ऑफ नॅशनल अॅक्रिडिटेशन बोर्ड ऑफ हॉस्पिटल्स अॅन्ड हेल्थकेअर प्रोफेशनल्स (एन.ए.बी.एच.), डेटा ॲक्विझिशन, क्लिनिकल डेटा मॅनेजमेंट (सीडीएम), कलेक्शन इंटिग्रेशन अॅन्ड अव्हेलॅबिलिटी ऑफ डेटा, व्हेरिफिकेशन, व्हॅलिडेशन अँड क्वालिटी कंट्रोल, हॉस्पिटल इन्फॉर्मेशन सिस्टीम (एचआयएस), पेशंट रिपोर्टेड सिस्टीम्स (पीआरएस), पब्लिक हेल्थ अँड एचआयएस, प्रायव्हेट हॉस्पिटल्स अँड एचआयएस या अत्याधुनिक हेल्थकेअर विषयांचा समावेश आहे.

जैव रसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. के. डी. सोनवणे म्हणाले, “क्लिनिकल रिसर्चसाठी हा अभ्यासक्रम अतिशय उपयुक्त आहे. हेल्थकेअर क्षेत्रात ड्रग सिन्थेसिसपासून ॲनिमल अथवा ह्युमन टेस्टिंगपर्यंत आणि तेथून अंतिम मान्यतेपर्यंतचा एक मोठा टप्पा असतो. त्यातल्या विविध टप्प्यांवर या विद्यार्थ्यांना काम करण्याची संधी असते. पोस्ट क्लिनिकल अभ्यास व संशोधन करण्यासाठीही मोठे अवकाश त्यांना उपलब्ध असते.अनेक राष्ट्रीय व बहुराष्ट्रीय फार्मास्युटिकल्स उद्योगांसह क्लिनिकल रिसर्च करणाऱ्या संस्था, औषध कंपन्या, मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल्स, टेलिमेडिसीन आदी अनेकविध क्षेत्रांत संधी उपलब्ध आहेत. ड्रग रेग्युलेटरी अफेअर्स, क्लिनिकल को-ऑर्डिनेटर, क्लिनिकल डाटा असोसिएट्स, क्लिनिकल रिसर्चर, मेडिकल राईटिंग, कॅपिटल सीआरएफ डेव्हलपर तसेच संशोधक म्हणून या क्षेत्रात विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. झायडस, साव्हा, सिंजेन, एरिस लाइफ सायन्सेस, कॅक्टस, कॉग्निझंट, टाटा ईएलएक्सआय, एस्ट्रा झेनिका, मर्क फार्मा, सिप्ला आदींसारख्या प्रख्यात हेल्थकेअर कंपन्यांसह वैद्यकीय हॉस्पिटल्समध्येही अनेक नवनवीन रोजगार संधी निर्माण होत आहेत.”

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 SEP 2019

तरुण भारत

# विद्यापीठात वैद्यकीय माहिती व्यवस्थापन अभ्यासक्रम

**कोल्हापूर :** जर्मन विद्यापीठाच्या सहकार्याने शिवाजी विद्यापीठाने एमएस्सीसाठी वैद्यकीय माहिती व्यवस्थापन शास्त्रामधील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केला आहे. विद्यापीठात हा पहिला आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सुरू होणार आहे. ३० सप्टेंबरपर्यंत या अभ्यासक्रमासाठी अर्ज करण्याची मुदत आहे.

वैद्यकीय माहिती व्यवस्थापन शास्त्र (मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट) ही जागतिक स्तरावरील हेल्थकेअर उद्योगाच्या दृष्टीने उदयास आलेली महत्त्वाची विज्ञानशाखा आहे. तिचे महत्त्व लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या जैवरसायनशास्त्र अधिविभागाने जर्मनीस्थित हॉश्चुल हॅनोव्हर युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायन्सेस अँड आर्ट्स या विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने या विषयाचा एमएस्सीसाठी दोन वर्षांचा अभ्यासक्रम या वर्षीपासून शिवाजी विद्यापीठात उपलब्ध केला आहे.

**३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याची मुदत**

ड्रग रेग्युलेटरी अफेअर्स, क्लिनिकल को-ऑर्डिनेटर, क्लिनिकल डाटा असोसिएट्स, क्लिनिकल रिसर्चर, मेडिकल राईटिंग, कॅपिटल सीआरएफ डेव्हलपर, संशोधक म्हणून या क्षेत्रात विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्याचे जैवरसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. के. डी. सोनवणे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

28 SEP 2019

तरुण भारत

# वनस्पतीशास्त्र प्रॅक्टीकल हॅण्डबुकचे प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र भाग–२च्या प्रॅक्टीकल हॅण्डबुकचे प्रकाशन डॉ. व्ही. डी. जाधव यांच्या हस्ते झाले. पुस्तकाचे लेखन डॉ. ए. एन. सादळे, डॉ. एम. बी. वाघमारे, डॉ. निलेश पवार, डॉ. एम.एन. देसाई, डॉ. एस. एन. जाधव, डॉ. एम.एस. बनसोडे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
28 SEP 2019
तरुण भारत

# मीडिया कक्ष सदस्यपदी डॉ. शिवाजी जाधव

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांची विधानसभा निवडणुकीसाठी जिल्हास्तरीय मीडिया, संपर्क व्यवस्थापन आणि सोशल मीडिया कक्ष सदस्यपदी नियुक्ती झाली. जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी ही नियुक्ती केली. मुद्रित, इलेक्ट्रॉनिक तसेच सोशल मीडियावरील आक्षेपार्ह मजकूर, जाहिराती आदींमध्ये निवडणूक कायद्याचे काटेकोर पालन होत असल्याची खात्री करण्याची जबाबदारी या समितीवर आहे. पक्ष व उमेदवारांच्या जाहिरातींचे प्रमाणिकरण करणाऱ्या समितीस सहाय्य, जाहिरातीचा मजकूर तपासण्याची जबाबदारी या समितीवर आहे. पक्ष, उमेदवारांकडून सोशल मीडियावरील प्रचारात आचारसंहितेचा भंग होतो का, यावर समितीचे लक्ष राहणार आहे. समितीत सायबरतज्ज्ञ, संगणकतज्ज्ञ, राज्य कर निरीक्षक, लेखापाल, माहिती सहायक आदींसह विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश आहे. मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि वेब अशा सर्व प्रकारच्या माध्यमांतील पेड न्यूजच्या संशयित प्रकरणांची छाननी करून ही प्रकरणे माध्यम प्रमाणिकरण आणि सनियंत्रण समितीकडे पाठवण्याची जबाबदारीही या समितीवर आहे. जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत सातपुते तिचे नोडल अधिकारी आहेत.